फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

सत्यमेव जयते

# जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

## सांगली जिल्हा

२००२–२००३

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन,
मुंबई

जिल्हा - सांगली

# जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - सन २००२-२००३

## अनुक्रमणिका


| अ.क्र | तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | भाग - १ | |
| | | दृष्टिक्षेपात सांगली जिल्हा | i |
| | | आर्थिक व सामाजिक समालोचन | v |
| | | भाग - २ | |
| | | 1] क्षेत्रफळ व लोकसंख्या | |
| 1 | 1.1 | १९९१ च्या जनगणनेनुसार तहसीलवार क्षेत्रफळ घरे व २००१ जनगणनेनुसार लोकसंख्या | 1 |
| 2 | 1.2 | १९५१ पासूनची लोकसंख्यमधील दशवार्षिक वाढ | 2 |
| 3 | 1.3 | १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गटानुसार गावांचे तहसीलवार वर्गीकरण | 4 |
| 4 | 1.4 | २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गटानुसार शहरांचे तहसीलवार वर्गीकरण | 4 |
| 5 | 1.5 [अ] | १९९१ च्या जनगणनेनुसार काम करणारे व काम न करणाऱ्यांची संख्या | 5 |
| 6 | 1.5 [ब] | १९९१ च्या जनगणनेनुसार मुख्यत: काम करणाऱ्या व्यक्तिंची उद्योग क्षेत्र निहाय विभागणी | 6 |
| 7 | 1.6 [अ] | १९९१ च्या लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण | 7 |
| 8 | 1.6 [ब] | १९९१ च्या लोकसंख्येचे धर्मानुसार वर्गीकरण | 7 |
| 9 | 1.7 | १९९१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती व जमातीकरिता आकडेवारी | 7 |
| 10 | 1.8 | १९९१ च्या जनगणनेनुसार भिंती व छपरे यासाठी वापरलेल्या साधन सामुग्रीनुसार घरांचे वर्गीकरण | 8 |
| 11 | 1.9 | १९९१ च्या जनगणनेनुसार आकार व मालकीच्या स्थितीनुसार ग्रामीण/नागरी कुटुंबांचे वर्गीकरण | 8 |
| 12 | 1.10 | १९९१ च्या जनगणनेनुसार जनगणना घरे आणि त्यांचा वापर | 9 |
| 13 | 1.11 | क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडाई जिल्हा उत्पन्न चालू किंमतीनुसार | 9 |
| 14 | 1.12 | क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडाई जिल्हा उत्पन्न स्थिर ( १९९३-९४ ) किंमतीनुसार | 10 |
| | | 2] हवामान | |
| 15 | 2.1 | निवडक केंद्रातील पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य | 10 |
| | | 3] कृषी | |
| 16 | 3.1 | जमिनीचा वापर | 12 |
| 17 | 3.2 | तालुकावार निरनिराळया पिकाखालील क्षेत्र | 12 |
| 18 | 3.3 | मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन व एकूण उत्पादन | 14 |
| 19 | 3.4 | विविध साधनाने ओलिताखालील क्षेत्र | 15 |
| 20 | 3.5 | निरनिराळया पिकाखालील ओलिताखालचे क्षेत्र | 15 |
| 21 | 3.6 [अ] | तालुकावार सिंचन विहीरी व इतर विहिरी | 16 |
| 22 | 3.6 [ब] | तालुकावार कुपनलिका,हातपंप व विद्युत पंपांची संख्या | 17 |
| 23 | 3.7 | लघु पाटबंधाऱ्यांची कामे | 17 |
| 24 | 3.8 | मध्यम व मोठे प्रकल्प यामुळे भिजणारे क्षेत्र व मिळणारे फायदे | 18 |
| 25 | 3.9 | वहित धारण जमिनींची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ | 20 |
| 26 | 3.10 | तालुकावार कृषी अवजारे | 21 |
| 27 | 3.11 | दुष्काळ टंचाई व टंचाई सदृश्य परिस्थितीची माहिती | 21 |

## अनुक्रमणिका पुढे चालू


| अ.क्र | तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | 4] पशुधन, मत्स्यव्यवसाय व जंगल | |
| 28 | 4.1 | तहसिलवार पशुधन [ १९९७ च्या पशुगणनेप्रमाणे] | 22 |
| 29 | 4.2 | जिल्हयातील पशुवैद्यकीय संस्थांची संख्या | 23 |
| 30 | 4.3[अ] | विविध पशुवैद्यकीय संस्थांचे कार्य | 24 |
| 31 | 4.4 | रोगांच्या प्रकारानुसार पशुच्या मृत्यूंची संख्या | 24 |
| 32 | 4.5 | मान्यताप्राप्त पशुवधगृहे व पशुवधगृहात कत्तल केलेल्या पशुंची संख्या | 24 |
| 33 | 4.6 | जिल्हयातील वन क्षेत्र | 25 |
| 34 | 4.7 | जिल्हयातील मुख्य व गौण वन उत्पादने | 25 |
| 35 | 4.8 | जिल्हयातील भूजल मत्स्य व्यवसाय | 25 |
| 36 | 4.9 | जिल्हयातील सागरी मत्स्य व्यवसाय | ** |
| | | 5] रोजगार,उद्योग,खाणकाम व विद्युत | |
| 37 | 5.1 | कारखान्यातील कामगारांची दैनिक सरासरी | 26 |
| 38 | 5.2 | चालु कारखान्यांचे कामगारांच्या संख्येनुसार वर्गीकरण | 27 |
| 39 | 5.3 | कामाच्या दिवसाच्या संख्येनुसार चालु असलेल्या कारखान्यांचे वर्गीकरण | 28 |
| 40 | 5.4 | उद्योगांच्या महत्वाच्या बाबींचा तपशिल | 29 |
| 41 | 5.5 | रोजगार विनिमय केंद्रातील आकडेवारी | 29 |
| 42 | 5.6 | व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम | 30 |
| 43 | 5.7 | कर्मचारी गणना | 30 |
| 44 | 5.8 | निरनिराळया उद्योगातील रोजगार | 30 |
| 45 | 5.9 | विद्युतीकरण झालेल्या शहरांची / गावांची संख्या व त्यांची लोकसंख्या | 31 |
| 46 | 5.10 | विजेचा वापर | 31 |
| 47 | 5.11 | कृषि व बिगर कृषि उद्योग | 31 |
| 48 | 5.12 | प्रमुख उद्योग गटानुसार उद्योगांची संख्या व कामगार | 32 |
| 49 | 5.13 | महत्वाच्या उद्योग गटानुसार कृषी व बिगर कृषी आस्थापनांची संख्या | 32 |
| 50 | 5.14 | महत्वाच्या उद्योग गटानुसार कृषि व बिगर कृषि आस्थापनांतील कामगार | 32 |
| 51 | 5.15 | बिगर कृषि सहकारी आस्थापना | 33 |
| 52 | 5.16 | प्रमुख उद्योग गटानुसार सहकारी औद्योगिक संस्था व रोजगार | 33 |
| 53 | 5.17 [अ] | वस्तुनिर्माण व दुरूस्ती सेवा गटातील स्वकार्यरत आस्थापना संस्था व कामगार | 33 |
| 54 | 5.17 [ब] | वस्तुनिर्माण व दुरूस्ती सेवा गटातील नेहमी काम केल्या जाणा-या आस्थापनाची संख्या व कामगार | 34 |
| 55 | 5.18 [अ] | घाउक व किरकोळ व्यापारामधील स्वकार्यरत उद्योगांची संख्या व कामगार | 34 |
| 56 | 5.18 [ब] | घाउक व किरकोळ व्यापार गटातील नेहमी काम काम केल्या जाणा-या आस्थापनांची संख्या व कामगार | 34 |
| 57 | 5.19 [अ]- | सामाजिक सामुहिक व व्यक्तीगत सेवा गटातील स्वकार्यरत संस्थांची संख्या वे कामगार | 35 |
| 58 | 5.19 [ब] | सामाजिक सामुहिक व व्यक्तीगत सेवा गटातील आस्थापनांची संख्या व नेहमी काम करणारे कामगार | 35 |
| 59 | 5.20 [अ] | सर्व उद्योग गट मिळून स्वकार्यरत संस्थांची संख्या व कामगार | 35 |
| 60 | 5.20 [ब] | सर्व उद्योग गट मिळून एकूण संस्था व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 36 |
| | | 6] सहकार | |
| 61 | 6.1 | विविध प्रकारच्या सहकारी संस्था | 36 |
| 62 | 6.2 | जिल्हयातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची माहिती | 37 |
| 63 | 6.3 | जिल्हयातील सहकारी संस्थांची लेखा परिक्षण वर्गानुसार वर्गवारी | 37 |
| 64 | 6.4 | राज्य आणि जिल्हा सहकारी बँकांचे कार्य | 37 |

# अनुक्रमणिका पुढे चालू



| अ.क्र | तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 65 | 6.5 | प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे कार्य | 38 |
| 66 | 6.6 | जिल्ह्यातील शेतकरी सेवा संस्थाचे कार्य | ** |
| 67 | 6.7 | जिल्ह्यातील आदिवासी सहकारी संस्थांचे कार्य | ** |
| 68 | 6.8 | जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी संस्थांनी दिलेली पीक कर्जे | 39 |
| 69 | 6.9 | जिल्ह्यातील शेतकरी सेवा संस्थांनी दिलेली पीक कर्जे | ** |
| 70 | 6.10 | जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी संस्थांनी दिलेली पीक कर्जे | ** |
| 71 | 6.11 | जिल्ह्यातील बिगर कृषी सहकारी पत संस्थांचे कार्य | 39 |
| 72 | 6.12 | जिल्ह्यातील पणन संस्थांचे कार्य | 39 |
| 73 | 6.13 | जिल्ह्यातील उत्पादक आणि सामाजिक सेवा संस्थांचे कार्य | 40 |
| 74 | 6.14 | जिल्ह्यातील उत्पादक आणि सामाजिक सेवा संस्थांचे महत्वाचे कार्य | 41 |
| 75 | 6.15 | जिल्ह्यातील नियंत्रित बाजारपेठांची माहिती | 41 |
| 76 | 6.16 | जिल्ह्यातील सावकारांची संख्या आणि त्यांनी दिलेली कर्जे | 43 |
| | | 7] आरोग्य | |
| 77 | 7.1 | सार्वजनिक व अर्थसहाय्यीत संस्थांमार्फत उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सोयी | 43 |
| 78 | 7.2 | नोंदणी केलेल्या जन्म मृत्यूची संख्या | 44 |
| 79 | 7.3 | विविध कारणानुसार मृत्यूची संख्या | 44 |
| 80 | 7.4 | माता बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत लस टोचणी | 45 |
| 81 | 7.5 | कुटूंब नियोजन केंद्राचे कार्य | 46 |
| | | 8] शिक्षण | |
| 82 | 8.1 | २००१ च्या जनगणनेनुसार तहसिल निहाय साक्षरता | 46 |
| 83 | 8.2 | शैक्षणिक संस्था आणि शिक्षकांची संख्या | 47 |
| 84 | 8.3 | प्राथमिक माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची स्तरनिहाय संख्या व मागासवर्गीयांची वर्गवारी | 47 |
| 85 | 8.4 | इतर प्रकारच्या शैक्षणिक संस्था | 48 |
| 86 | 8.5 | आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती | 48 |
| 87 | 8.6 | प्राथमिक शिक्षणावरील खर्च | 48 |
| 88 | 8.7 | जिल्ह्यातील व्यवसायीक शिक्षण | 49 |
| 89 | 8.8 | जिल्ह्यातील संपूर्ण साक्षरता मोहिम | ** |
| 90 | 8.9 | शिक्षकांकरीता प्रशिक्षण संस्था | 49 |
| 91 | 8.10 | तालुकावार शारीरीक शिक्षण महाविद्यालये, क्रिडांगणे, क्रिडा, शिष्यवृत्तीधारक ई ची माहीती | 49 |
| | | 9] वाहतूक व दळणवळण | |
| 92 | 9.1 [ अ ] | रेल्वे मार्गाची लांबी | 49 |
| 93 | 9.1 ( ब ) | तहसिलवार रेल्वे स्थानकांची यादी | 50 |
| 94 | 9.2 | प्रकार व पृष्टभाग यानुसार रस्त्यांची लांबी | 50 |
| 95 | 9.3 | वापरात असलेल्या मोटार वाहनांची संख्या | 51 |
| 96 | 9.4 | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाची वाहतूक विषयक आकडेवारी | 51 |
| 97 | 9.5 | महत्वाच्या रस्त्यावरील वाहतूक गणना | 51 |
| 98 | 9.6 | पोस्ट, तारखाते व दुरध्वनी यांची आकडेवारी | 55 |
| | | 10] स्थानिक संस्था | |
| 99 | 10.1 | स्थानिक संस्थाचे उत्पन्न व खर्च | 55 |
| 100 | 10.2 | ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्च | 56 |
| 101 | 10.3 | जिल्हा परिषदेचे उत्पन्न व खर्च | 56 |
| 102 | 10.4 | महानगरपालिका, नगरपालिका यांचे उत्पन्न व खर्च | 57 |

## अनुक्रमणिका पुढे चालू


| अ.क्र. | तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | 11] नियोजन | |
| 103 | 11.1 | विविध विकास शिर्षाखालील योजनांतर्गत खर्च | 58 |
| 104 | 11.2 | योजने खालील महत्वाची भौतिक साध्ये | 59 |
| 105 | 11.3 | रोजगार हमी योजना | 60 |
| 106 | 11.4 | रोजगार हमी योजनांखालील कामे व त्यावरील खर्च | 61 |
| 107 | 11.5 | पिण्याच्या पाण्याच्या सोई व टंचाईबाबत उपाययोजना | 61 |
| 108 | 11.6 | आधिक उत्पन्न,संकरीत व सुधारीत पिकांच्या जाती खालील क्षेत्र | 61 |
| 109 | 11.7 | रासायनिक खतांचे वाटप | 62 |
| 110 | 11.8 | साखर कारखाने | 62 |
| 111 | 11.9 | दुग्ध संस्थांची माहिती | 62 |
| 112 | 11.10 | अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम | 63 |
| 113 | 11.11 | आदिवासी विकास कामाची प्रगती व त्यावरील खर्च | ** |
| 114 | 11.12 | वीस कलमी कार्यक्रम | 63 |
| 115 | 11.13 | विशेष घटक योजना | 64 |
| 116 | 11.14 [अ] | विधानसभा सदस्यांचा स्थानिक विकास कार्यक्रम | 64 |
| | 11.14 [ब] | विधानपरिषद सदस्यांचा स्थानिक विकास कार्यक्रम | 65 |
| | 11.14 [क] | खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम | 65 |
| | 11.14 [ड] | खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम ( राज्यसभा सदस्य ) | 65 |
| | | 12] किंमती व निर्देशांक | |
| 117 | 12.1 | निवडक शेतीमालाच्या सरासरी घाउक किंमती | 66 |
| 118 | 12.2 | जिल्हा मुख्यालयातील महत्वाच्या वस्तुंच्या मासिक सरासरी किरकोळ किंमती | 67 |
| 119 | 12.3 | महत्वाचे ग्राहक किंमतीचे निर्देशांक | 70 |
| | | 13] न्याय व प्रशासन | |
| 120 | 13.1 | जिल्हयातील पोलिस दलाची एकूण संख्या | 70 |
| 121 | 13.2 | गुन्हेगारी संबंधीची आकडेवारी | 71 |
| 122 | 13.3 | तुरुंगात दाखल केलेले गुन्हेगार | 71 |
| 123 | 13.4 | तुरुंगात दाखल केलेल्या गुन्हेगारांचे वयोगटानुसार व शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण | 72 |
| 124 | 13.5 | दिवाणी व फौजदारी न्यायालयात निकाली काढलेली कामे. | 72 |
| | | 14] बँका व विमा | |
| 125 | 14.1 | बँक कार्यालये आणि त्यांच्या ठेवी व कर्जे | 73 |
| 126 | 14.2 | संयुक्त भांडवली संस्था | 73 |
| 127 | 14.3 | उतरविलेल्या विमा पत्रांची संख्या व विम्याची रक्कम | 73 |
| | | 15] संकीर्ण | |
| 128 | 15.1 | चित्रपटगृह विषयी आकडेवारी | 74 |
| 129 | 15.2 | जिल्हयातील गोळा केलेल्या अल्पबचतीची रक्कम | 74 |
| 130 | 15.3 | तहसिलवार गोळा केलेला महसूल | 75 |
| 131 | 15.4 | छापखाने व छापलेली व प्रकाशित केलेली वत्तपत्रे व नियतकालीके | 75 |
| 132 | 15.5 | स्वस्त धान्य दुकानदारांना पुरविलेले गहू ,तांदुळ व साखर | 76 |
| 133 | 15.6 | लोकसभा व विधानसभा निवडणुका बाबत आकडेवारी | 76 |
| 134 | 15.7 | अधिकारी व प्रवाशी यांचेसाठी असलेल्या विश्रामगृहांची यादी | 76 |
| 135 | 15.8 | निवडक निर्देशांकांचा कल | 77 |


टीप -१) ** सदर तक्त्यांची माहिती निरंक असलेने या प्रकाशनात छापलेली नाहीत , २) दिनांक २८-३-२००२ कडेगाव तालुक्याची निर्मीती झाली परंतु स्वतंत्र पंचायत समिती न झाल्या कारणाने बहुतांश तक्त्यांची कडेगाव तालुक्याची स्वतंत्र माहिती उपलब्ध झालेली नाही. ज्या बाबींची माहिती उपलब्ध झाली ती कडेगाव तालूक्यापूढे स्वतंत्रपणे दर्शविली आहे.

# भाग - १

## जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2002-2003

### दृष्टिक्षेपात सांगली जिल्हा

| अ.क्र | बाब | परीमाण | जिल्हा | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| एक | प्राकृतिक रचना | | | |
| | अ] भौगोलिक स्थान | | | |
| | १] उत्तर अक्षांश | अंश | 16.45 ते 17.22 | 16.4 ते 22.1 |
| | २] पूर्व रेखांश | अंश | 73.42 ते 75.40 | 72.6 ते 80.9 |
| | ब] हवामान | | | 2001-02 |
| | तपमान १] किमान | डिग्री सेल्सियस | - | 5.6 |
| | २] कमाल | डिग्री सेल्सियस | - | 45.9 |
| | | | 2002 | 1998 |
| | ३] सरासरी पर्जन्य | मि.मि. | 409 | 1628 |
| | क] प्रशासकिय विभाग २००२-२००३ | | | |
| | १] तहसिल | संख्या | 10 | 353 |
| | २] पंचायत समिती | संख्या | 9 | 347 |
| | ३] टंचाईग्रस्त तालुके | संख्या | 2 | उ.ना. |
| | ४] एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्प | संख्या | 8 | उ.ना. |
| | ५] शहरे | संख्या | 8 | 378 |
| | ६] गावे ( एकूण ) | संख्या | 724 | 43722 |
| | १] निर्जन | संख्या | 8 | उ.ना. |
| | २] वस्ति असलेली | संख्या | 732 | 43722 * |
| | ७] क्षेत्रफळ | चौरस कि.मी. | 8572.00 | 307583 |
| दोन | प्रशासकिय संस्था | | | 2002-03 |
| | १] पंचायत समित्या | संख्या | 9 | 347 |
| | २] महानगरपालिका | संख्या | 1 | 19 |
| | ३] नगरपरिषदा | संख्या | 4 | 224 |
| | ४] कटकमंडळे | संख्या | - | 7 |
| | ५] ग्रामपंचायती | संख्या | 705 | 27805 # |
| | | | 31-3-03 | 31/12/2001 |
| | ६] पोलिस ठाणे | संख्या | 22 | 926 |
| | ७] पोलिस औटपोस्ट | संख्या | 25 | 1769 |
| तीन | लोकसंख्या २००१ प्रमाणे | | | |
| | १] ग्रामीण लोकसंख्या | आकडे हजारांत | 1949 | 55732 |
| | २] नागरी लोकसंख्या | आकडे हजारांत | 633 | 41020 |
| | ३]एकूण लोकसंख्या | आकडे हजारांत | 2582 | 96752 |
| | ४] अनुसूचित जातीची लोकसंख्या (१९९१) | आकडे हजारांत | 277 | 8758 |
| | ५] अनु.जातीच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी ९१ | टक्केवारी | 12.53 | 11.09 |
| | ६] अनुसूचित जमातीची लोकसंख्या (१९९१) | आकडे हजारांत | 11 | 7318 |
| | ७] अनु.जमातीच्या लोकसंख्येची एकुण लोकसंख्येशी टक्केवारी ९१ | टक्केवारी | 0.49 | 9.27 |
| | ८] पुरुष २००१ | आकडे हजारांत | 1319 | 50334 |
| | ९] स्त्रिया २००१ | आकडे हजारांत | 1263 | 46418 |
| | १०] स्त्री-पुरुष प्रमाण २००१ | १००० पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण | 957 | 922 |
| | ११] घनता २००१ | दर चौ.कि.मी.क्षेत्रातील लोकसंख्या | 301 | 314 |
| | १२] साक्षरतेचे प्रमाण २००१ | | | |
| | १] एकूण | टक्केवारी | 76.79 | 77.3 |
| | २] पुरुष | टक्केवारी | 86.25 | 86.3 |
| | ३] स्त्रिया | टक्केवारी | 66.88 | 67.5 |

## दृष्टिक्षेपात सांगली जिल्हा पुढे चालु

| अ.क्र | बाब | परीमाण | जिल्हा | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | ४] राज्यामध्ये जिल्हयाचा क्रमांक | संख्या | 15 | - |
| चार | कृषी | | 1998/99++ | अस्थायी |
| | १] भौगोलिक क्षेत्र | हजार हेक्टर | *861 | 30758 |
| | २] जंगलव्याप्त क्षेत्र | हजार हेक्टर | 48 | 5214 |
| | त्यांची एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | टक्केवारी | 5.52 | 16.95 |
| | ३] शेतीला उपलब्ध नसलेली जमीन | | | - |
| | अ] बिगर शेती वापराखालील जमीन | हजार हेक्टर | 39 | 1380 |
| | ब] पडीक आणि लागवडीलायक नसलेली जमीन | हजार हेक्टर | 38 | 1720 |
| | क] एकूण [अ+ब] | हजार हेक्टर | 77 | 3100 |
| | ४] पडीक जमिनीव्यतिरिक्त लागवड न केलेली इतर जमीन | | | |
| | १] कायम गुरे चरण आणि इतर | हजार हेक्टर | 20 | 1249 |
| | २] झाडेझुडपाखालील जमीन | हजार हेक्टर | 16 | 247 |
| | ३] लागवडीयोग्य परंतु पड जमीन | हजार हेक्टर | 25 | 915 |
| | ५] पडीक जमीन | | | |
| | १] चालू पड | हजार हेक्टर | 33 | 1255 |
| | २] इतर पड | हजार हेक्टर | 45 | 1200 |
| | ६] पिकाखालील क्षेत्र | | | |
| | १] पिकाखालील निव्वळ क्षेत्र | हजार हेक्टर | 597 | 17579 |
| | २] दुसांटा क्षेत्र | हजार हेक्टर | 162 | 4808 |
| | ३] एकूण पिकाखालील क्षेत्र | हजार हेक्टर | 759 | 22387 |
| | ७] ओलित क्षेत्र | | | |
| | १] निव्वळ ओलित क्षेत्र | हजार हेक्टर | 138 | 2971 |
| | २] एकूण ओलित क्षेत्र | हजार हेक्टर | 154 | 3668 |
| | ८] महत्वाच्या पिकाखालील क्षेत्र (अन्धान्य) | हजार हेक्टर | 532 | 12779 |
| | ९] वहिल धारण जमीन अंतिम | | 1990-91 | 1995-96 |
| | १] २ हेक्टरपेक्षा कमी | संख्या हजारात | 292 | 7442 |
| | २] २ ते १० हेक्टर | संख्या हजारात | 107 | 3095 |
| | ३] १० हेक्टरपेक्षा जास्त | संख्या हजारात | 6 | 116 |
| | १०] जमीन महसूल वसूली (२००२-२००३) | लाख रूपये | 408.71 | उ.ना. |
| | ११] जिल्हा परिषदेचा उपकर | रू. हजारात | 7375 | 2368 (लाख) |
| | १२] पंचायत समितीचा उपकर | रू. हजारात | | |
| पाच | **पशुसंवर्धन - पशुगणना १९९७ प्रमाणे** | | | |
| | १] एकूण पशुधन | संख्या हजारात | 1438 | 39638 |
| | २] गाई व बैल | संख्या हजारात | 225 | 18071 |
| | ३] म्हशी व रेडे | संख्या हजारात | 468 | 6073 |
| | ४] मेंढया आणि शेळया | संख्या हजारात | 583 | 14802 |
| | ५] कोंबडया व बदके | संख्या हजारात | 2433 | 35392 |
| सहा | **सहकार २००२-२००३** | | | |
| | १] सहकारी संस्था | संख्या | 4834 | 173402 |
| | २] प्राथमिक कृषी सहकारी पत संस्था | संख्या | 681 | 20839 |
| | ३] प्राथमिक कृषी सहकारी पत संस्थांची सभासद संख्या | संख्या हजारात | 469 | 11436 |
| | ४] सहकारी दुग्ध संस्था | संख्या | 769 | 25574 |
| | ५] प्राथमिक कृषी पत संस्थानी दिलेली कर्जे | रू. कोटीत | 417.91 | 4076 |
| सात | **जलसिंचन** | | जून 2003प्रमाणे | जून 2003प्रमाणे |
| | पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्याखालील लाभक्षेत्र | | | |
| | १] मोठे प्रकल्प | संख्या | - | 32 |
| | २] मध्यम प्रकल्प | संख्या | 5 | 178 |
| | १ व २ चे लाभक्षेत्र | हजार हेक्टर | 11 | उ.ना. |
| | ३] लघु प्रकल्प [राज्य क्षेत्र] | संख्या | 74 | 2182 |
| | लाभक्षेत्र | हजार हेक्टर | 28 | उ.ना. |
| | ४] सिंचन विहीरीखालील भिजणारे क्षेत्र | हजार हेक्टर | 111 | 1931 |

## दृष्टिक्षेपात सांगली जिल्हा पुढे चालू

| अ.क्र. | बाब | परीमाण | जिल्हा | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| आठ | उद्योग | | 2002प्रमाणे | 2002प्रमाणे |
| | १] नोंदणीकृत कारखान्यांची संख्या | संख्या | 681 | 34170 |
| | २] नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या [उत्पादन चालू कारखाने] | संख्या | 619 | 28707 |
| | ३] सहकारी साखर कारखान्यांची संख्या २००२-२००३ | संख्या | 17 | 201 [अस्थाई] |
| | ४] सहकारी साखर कारखान्यांतील उत्पादन २००२-२००३ | हजार मे.टन | 522 | 6218 |
| | ५] सर्व सूत गिरण्यांची संख्या २००२ | संख्या | 21 | 230 |
| नऊ | वीज | | 31.3.2003 | 31.3.98 |
| | १] वीज पुरवठा केलेली गावे व शहरे | संख्या | 732 | 39413 |
| | २] विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या | संख्या | 724 | उ.ना. |
| | ३]वीज पुरवठा केलेले पंप संच मार्च २००३ अखेरपर्यंत | संख्या हजारात | 113 | 2417 |
| | ४] बसविण्यात आलेले गोबर गॅस सयंत्रे | संख्या हजारात | 0.643 | उ.ना. |
| दहा | सार्वजनिक आरोग्य | | 2002 प्रमाणे | 2002 प्रमाणे |
| | १] रूग्णालये | संख्या | 17 | 964 |
| | २] दवाखाना | संख्या | 70 | 2081 |
| | ३] प्राथमिक आरोग्य केंद्रे | संख्या | 59 | 1806 |
| | ४] प्राथमिक आरोग्य पथके (अस्थायी ) | संख्या | | 174 |
| अकरा | शिक्षण | | 2002/03प्रमाणे | 2002/03 प्रमाणे |
| | १] एकुण प्राथमिक शाळा | संख्या | 1845 | 67062 |
| | २] प्राथमिक शाळेतील विद्यार्थी | संख्या हजारात | 305 | 11837 |
| | ३] प्राथमिक शाळेतिल शिक्षक | संख्या हजारात | 9 | 315 |
| | ४] प्रत्येक शिक्षकामागे प्राथमिक शाळेतील विद्यार्थी | संख्या | 33 | 38 |
| बारा | माधमिक शिक्षण उच्च माध्यमिक सह | | 2002-03 | 2002-03 |
| | १] दुय्यम शाळा | संख्या | 426 | 16917 |
| | २] शाळेतील एकुण विद्यार्थी | संख्या हजारात | 145 | 9864 |
| | ३] शाळेतील शिक्षक | संख्या हजारात | 4 | 267 |
| | ४] प्रत्येक शिक्षकामागे माध्यमिक शाळेतील विद्यार्थी | संख्या | 33 | 37 |
| तेरा | उच्च शिक्षण | | 1999-2000 | 2002-03 |
| | १] संस्था | संख्या | 55 | 1786 (अस्थायी) |
| | २] एकुण विद्यार्थी | संख्या हजारात | 36 | 1035 (अस्थायी) |
| चौदा | अ] प्रौढ शिक्षण २००२-२००३ | | | |
| | १] प्रौढ शिक्षण केंद्रे | संख्या | निरंक | उ.ना. |
| | २] प्रौढांची उपस्थिती [ साक्षर ] | संख्या हजारात | निरंक | 5410 |
| | ब] तांत्रिक व व्यवसाय शिक्षण २००२-२००३ | | | |
| | १] औद्योगिक प्रशिक्षण संस्था | संख्या | 15 | 612 |
| | १] शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था | संख्या | 8 | 347 |
| | २] अशासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था | संख्या | 7 | 265 |
| | २] शासकिय व अशासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाची प्रवेश क्षमता | संख्या | 1540 | 93169 |
| | ३] पदवी अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था व<br>त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता | संख्या<br>संख्या | उ.ना.<br>उ.ना. | 146<br>45232 |
| | ४] पदवीका अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था व<br>त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता | संख्या<br>संख्या | उ.ना.<br>उ.ना. | 170<br>40185 |
| | ५] व्यवसाय शिक्षण संस्था ( माध्यमिक व उच्च माध्यमिक गट)<br>व त्यांचे प्रवेश क्षमता | संख्या<br>हजारात | 48<br>2870 | उ.ना.<br>उ.ना. |

| अ.क्र. | बाब | परीमाण | जिल्हा | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | परिवहन आणि दळणवळण (मार्च २००३ अखेर) | | | |
| | १] एकुण रेल्वे मार्ग लांबी | किलो मीटर | 173.70 | 5450 |
| | २] रस्त्याने जोडलेली गावे | | 31/3/2003 | 31/3/2002 |
| | अ] बारमाही | संख्या | उ.ना. | 37585 |
| | ब] हंगामी | संख्या | उ.ना. | 1927 |
| पंधरा | ३] एकुण रस्त्यांची लांबी (पृष्ठांकित) ३१/३/२००३ | किलो मीटर | 9703 | 224940 |
| | ४] राष्ट्रीय महामार्गाची लांबी | किलो मीटर | 30 | 3710 |
| | ५] राज्य महामार्गाची लांबी | किलो मीटर | 931 | 33705 |
| | ६] महत्वाच्या जिल्हा रस्त्याची लांबी | किलो मीटर | 2228 | 48192 |
| | ७] इतर जिल्हा रस्त्याची लांबी | किलो मीटर | 2715 | 44183 |
| | ८] ग्रामीण रस्त्यांची लांबी | किलो मीटर | 3324 | 95150 |
| | एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम | | | |
| सोळा | अ] दारिद्रय रेषेखालील कुटुंबे (१९९७-९८) | संख्या लाखात | 0.51 | 38.19 |
| | ब] स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना २००२-०३ | संख्या | 1092 | 55772 |
| | रोजगार निर्मिती २००२-२००३ | | | |
| सतरा | अ] रोजगार हमी योजना | मनुष्य दिवस लाखात | 1.88 | 1545.05 |
| | ब] जवाहर ग्रामसमृध्दी योजना (२००२-२००३ अखेर) | मनुष्य दिवस लाखात | 5.40 | 530.68 |
| | आदिवासी कल्याणकारी योजना | | | 31/3/2003 |
| अठरा | आदिवासी करीता आश्रमशाळा | संख्या | लागू नाही | 929 |
| | विद्यार्थी | संख्या | लागू नाही | 312907 |
| | मागासवर्गीयसाठी कल्याणकारी योजना | | 2002/03 | 2002/03 |
| एकोणीस | १] मागासवर्गीयसाठी वसतीगृहे | संख्या | 12 | 243 |
| | २) वसतीगृहात राहणारे विद्यार्थी | संख्या | 855 | 19028 |
| | जिल्हा नियोजन २००२-२००३ | | | |
| वीस | १] वार्षीक योजनेतील मंजूर तरतूद [ GEN/SCP/OTSP/MLA/MLC] | रू.कोटीत | 35.86 | 3086.38 |
| | २] अनुशेष भरून काढण्यासाठी तरतूद [Dist level] | रू.लाखात | 46 | 422.97 |
| | नागरी पुरवठा २००२-२००३ | | | |
| | १] रास्त भावाची दुकाने | संख्या | 1327 | 49921 |
| | २] पुरविलेला एकूण साठा | | 2003 | 2003 अखेर |
| एकवीस | अ] गहू | हजार टन | 28 | 863 |
| | ब] तांदूळ | हजार टन | 14 | 501 |
| | | | | 30/6/2003 |
| | ३]शासकिय गुदामे | संख्या | 29 | 994 |
| | ४]साठविण्याची क्षमता | लाख मे. टनात | 0.14 | 5.84 |

टीप- १) उ.ना. = उपलब्ध नाही. २) * - वस्ती नसलेली गावे वगळून ३) # - नगरपंचायतीसह

आधार- १] अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२] जिल्हा सांख्यिकी कार्यालय,सांगली.

# आर्थिक व सामाजिक समालोचन

## १. रचना व व्याप्ती -

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९४९ मध्ये तत्कालीन सातारा जिल्ह्यातील तासगांव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालुके हस्तांतरीत करुन तसेच राज्याच्या इतर संस्थानातून भाग घेऊन मिरज व जत हे आणखी दोन तालुके निर्माण करुन सहा तालुक्यांचा दक्षिण सातारा नांवाचा नवीन जिल्हा निर्माण करण्यांत आला. त्यामध्ये प्रामुख्याने औंध, जत, सांगली, कुरुंदवाड, मिरज या संस्थानांचा समावेश होता. जिल्ह्याचे दिनांक २१ नोव्हेंबर १९६० रोजी दक्षिण सातारा हे नांव बदलून सांगली असे करण्यांत आले. १९६५ मध्ये मिरज व खानापूर या तालुक्याचे विभाजन करुन कवठे महांकाळ व आटपाडी असे आणखी दोन तालुके नव्याने निर्माण करण्यांत आले पुन्हा दिनांक १ जुलै १९९९ रोजी खानापूर (१३ गावे) व तासगांव (३९ गावे) या तालुक्याचे विभाजन करुन पलूस हा ५२ गावांचा नवीन तालुका निर्माण करण्यांत आला आहे. परंतु तदनंतर ह्या पलूस तालुक्यातील (पुर्वाश्रमीच्या खानापूरमधील) १३ गावे व खानापूर मधील नवीन ४२ गावे मिळून कडेगाव हा ५५ गावांचा जिल्ह्याचा १० वा तालुका दि.२८-३-२००२ रोजी नव्याने निर्माण झाला आहे. त्यामुळे पलुस तालुका ३९ गावांचा झाला आहे. सध्या सांगली जिल्हा १० तालुक्यांचा झाला असून जिल्ह्यात सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका तसेच इस्लामपूर, आष्टा, तासगांव व विटा या चार नगरपालिका कार्यरत आहेत.

## २. स्थान-

सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८५७२ चौ.कि.मी. असून भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यामध्ये २१ वा क्रमांक आहे. जिल्ह्याचा विस्तार १६.४५ अंश ते १७.३३ अंश उत्तर अक्षांश व ७३.४२ अंश ते ७५.४० अंश पुर्व रेखांश असा आहे. पूर्व पश्चिम लांबी अंदाजे २०५ कि.मी.व दक्षिण उत्तर रुंदी अंदाजे ९६ कि.मी. आहे.सांगली जिल्ह्याची समुद्रसपाटी पासून उंची ५५१ मिटर आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस सातारा व सोलापूर जिल्हा, दक्षिणेस कोल्हापूर जिल्हा व कर्नाटक राज्यातील बेळगांव व विजापूर जिल्हा, पूर्वेस कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हा व पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा आहे.

## ३. भूपृष्ट व भूस्तरीय संरचना-

भूपृष्ठ, हवामान व पर्जन्यमान यानुसार जिल्ह्याचे (१) पश्चिमेकडील डोंगराळ व जास्त पावसाचा प्रदेश (२) नद्यांच्या सानिध्यातील मध्यम पावसाचा सपाट प्रदेश व (३) पूर्वेकडील पठारांचा व भरड मातीचा कमी पावसाचा कांहीसा दुष्काळी प्रदेश असे तीन स्वाभाविक विभाग पडतात. पश्चिमेकडील सहयाद्रीच्या पूर्व उताराच्या डोंगर रांगा व त्यातून निघणा-या भैरवगड डोंगररांगा यांनी मुख्यत: शिराळा व वाळवा तहसिल मधील पश्चिम भाग व्यापलेला आहे. कृष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या सानिध्यातील मध्यम पावसाचा सपाट व सुपीक प्रदेश यामध्ये मिरज तहसिलचा पश्चिम व उत्तर भाग पलूस तहसिलचा पश्चिम तर वाळवा व शिराळा तहसिलाचा पूर्व भाग येतो पूर्वेकडील प्रदेश कमी पावसाचा भरड मातीचा भाग असून यात आटपाडी,जत,कवठेमहांकाळ,खानापूर या तहसिलांचा समावेश होतो त्याचबरोबर मिरज व तासगांव या तहसिलच्या पूर्व भागाचाही समावेश होतो.

जिल्ह्यामध्ये विविध प्रकारची माती आढळून येते. शिराळा तालुक्यामध्ये पिवळसर तांबडी, तपकिरी २३ ते ४५ से.मी.खोलीपर्यंत लॅटराईट प्रकारची मुरुम मिश्रीत व लोहाचे प्रमाण अधिक असलेली माती आहे. डोंगर उतार सोडून इतर भागात फिक्कट करडया रंगाची माती आढळते.कृष्णा, वारणा व येरळा या नद्यांच्या खो-यात काळी कसदार उच्चप्रतीची ९० से.मी.पेक्षा जास्त खोलीची माती आढळते.यात वाळवा,तासगांव व मिरज तहसिलचा समावेश होतो. बोर, अग्रणी,व माण या नद्या व काही ओढयांच्या सानीध्यातही काळी उत्तम प्रतीची माती आढळते.त्यामध्ये आटपाडी,जत,खानापूर इ.तहसिल येतात.

भूजल पातळी सर्वसाधारणपणे ६ मीटर खोलीवर आढळते.तथापि भूगर्भातील अंतर्गत खडकानुसार कमी अधिक खोलीवर भूजल आढळून येते.विशेषत: जिल्ह्याच्या पूर्व भागात पाण्याचे प्रमाण कमी आहे.

**४. धार्मीक व पर्यटन स्थळे -**

सांगली येथे श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन संस्थानिक यांनी कृष्णा नदी काठी १८४४ मध्ये बांधलेले गणेश मंदीर तसेच हरिपूर मार्गालगत बांधलेले बागेतील गणेश मंदीर ही सांग्लीच्या जनतेची श्रध्दास्थाने आहेत. श्री क्षेत्र औदुंबर येथील दत्त मंदीर हे पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता पावले आहे.तासगांव येथील मराठयांचे दक्षिणेतील सेनानी परशुरामभाऊ पटवर्धन यांनी तासगांव येथे भव्य गोपूर असलेले गणेश मंदीर १७९९ मधे बांधले असून ते अति प्राचीन वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे.

त्याशिवाय मिरज व कवठे महांकाळ तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या दंडोबा डोंगरावरील शिवमंदीर, ब्रम्हनाळ येथील कृष्णा येरळा नदयांच्या संगमाजवळील महादेव मंदीर, बहे तालुका वाळवा येथील रामलिंग मंदीर, किल्ले मच्छिंद्र गड येथील नाथ संप्रदायातील मच्छिंद्रनाथांची समाधी, रेणावी तालुका खानापूर येथील रेवणसिध्द समाधी, भिवघाट नजीक शुकाचार्यांची समाधी इ.धार्मिक स्थळे नावाजलेली आहेत.

सांगली जिल्हयामध्ये चांदोली हे अभयारण्य रत्नागिरी कोल्हापूर व सांगली जिल्हयाच्या सरहददीवर व सागरेश्वर अभयारण्य,वाळवा खानापूर व तासगांव तालुक्याच्या सरहददीवर आहे.बत्तीस शिराळा येथे दरवर्षी नागपंचमीला जिवंत नागाची पूजा केली जाते. तसेच नागाची मिरवणूक काढून नाग खेळवले जातात.दरवर्षी नाग पंचमीस सर्व देशभरातून तसेच परदेशातून हजारो लोक येत असतात.

**५. पर्जन्य -**

जिल्हयाच्या पश्चिमेकडील शिराळा तालुक्यात पर्जन्यमान सर्वात अधिक असून तेथील हवामान थंड आहे.पश्चिमेकडून पूर्वेकडे पर्जन्यमान कमी कमी होत जाते.सन २००२ मधील जिल्हयाचे एकूण पर्जन्यमान ४०९२ मि.मी.असून सर्वात जास्त पाऊस शिराळा तहसिल मध्ये व सर्वात कमी पाऊस कडेगांव व पलूस तहसिल मध्ये झाला आहे.

**६. नद्या -**

प्रामुख्याने कृष्णा,वारणा,येरळा,माण,बोर व अग्रणी या नद्या सांगली जिल्हयातून वाहतात.त्यापैकी कृष्णा,वारणा व येरळा या नद्या निश्चीत पाऊस असलेल्या प्रदेशातून वाहतात. कृष्णा नदी ही सुरुवातीस पश्चिमेकडून पूर्वेकडे नंतर दक्षिण पूर्व दिशेकडे जिल्हयातून अंदाजे १३० कि.मी. वाहते. वारणा नदी पश्चिम दक्षिण दिशेकडून पूर्वेकडे कोल्हापूर सांगली जिल्हयाच्या हददीवरुन १७३ कि.मी.वाहत जाऊन सांगली जवळील हरिपूर येथे कृष्णेस मिळते.जिल्हयातून येरळा नदी उत्तर दक्षिण ८५ कि.मी., अग्रणी व माण नदी उत्तर पश्चिम दिशेकडून दक्षिण पूर्वेकडे अनुक्रमे ८५ कि.मी. व ३५ कि.मी. तर बोर नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे अंदाजे ६४ कि.मी.वाहते.

वरील पैकी कृष्णा व वारणा नद्यावरुन पाटबंधारे व उपसा सिंचन योजना द्वारे जमिनी ओलिताखाली आणलेल्या आहेत.त्याशिवाय महत्वाकांक्षी कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प,टेंबू प्रकल्प व वाकूर्डे पाणी योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

**७. प्रशासकीय विभाग-** जिल्हा मुख्यालय सांगली येथे असून लोहमार्गाद्वारे थेट दिल्ली,मुंबई,पुणे, बेंगलोर,कलकत्ता इ. शहरांना जोडलेले आहे.पूणे बेंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग क्र.४ हा जिल्हयातून जातो.पोष्ट ,दूरध्वनी आकाशवाणी दूरदर्शन आदि सर्व माध्यमानी सदेर जिल्हा संपूर्ण जगाशी जोडला आहे. प्रशासकीय सोईसाठी जिल्हयामध्ये वाळवा,मिरज व खानापूर असे तीन प्रशासकीय विभाग कार्यरत असून दहा तहसिल, नऊ विकास गट, एक महानगरपालिका व चार नगरपालिका जिल्हयात कार्यरत आहेत.

**८. लोकसंख्या-** २००१ च्या जनगणनेप्रमाणे सांगली जिल्हयाची लोकसंख्या २५,८१,८३५ इतकी असून पैकी १३,१९,२६७ पुरुष व १२,६२,५६८ इतक्या स्त्रिया आहेत.लोकसंख्येच्या बाबतीत सांगली

जिल्हा महाराष्ट्र राज्यात १७ वा आहे.जिल्हयामध्ये प्रति खेडेगांव २६९२ इतकी सरासरी लोकसंख्या येते जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी सर्वात जास्त लोकसंख्या मिरज तालुक्यात (२९ टक्के) व सर्वात कमी लोकसंख्या आटपाडी तालुक्यात (७ टक्के) आहे.

*८.१ लोकसंख्या वाढीचा दर -* १९९१-२००१ या दशकामध्ये सांगली जिल्हयातील लोकसंख्या वाढीचा दर १९८१-९१ या दशकामधील २०.४५ टक्कयावरुन १६.८५ टक्कयावर आला आहे.दशवार्षीक लोकसंख्यावाढीचा दर हा ग्रामीण भागात १४ टक्के व शहरी भागात सुमारे २६ टक्के इतका आहे. लोकसंख्या वाढीचा जिल्हयाचा १६.८५ टक्के दर राज्याच्या सरासरी २२.७७ टक्के पेक्षा कमी आहे.

*८.२ लोकसंख्येची घनता-* २००१ जनगणनेनुसार सांगली जिल्हयातील लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. मागे ३०१ इतकी आहे.लोकसंख्येची जिल्हयाची घनता राज्य सरासरी पेक्षा कमी आहे.

*८.३ ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण-* २००१ जनगणनेनुसार एकूण २५.८२ लाख लोकसंख्येपैकी १९.४९ लाख (७५ टक्के) ग्रामीण व ६.३३ लाख (२५ टक्के) शहरी लोकसंख्या आहे.एकूण शहरी लोकसंख्येपैकी ६९ टक्के लोक सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रात रहातात.

*८.४ स्त्री पुरुष प्रमाण-* २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात दर हजार पुरुषा मागे ९५७ स्त्रिया असे प्रमाण आहे.स्त्री पुरुष प्रमाण शिराळा तालुक्यात सर्वाधिक १०१७ तर सर्वात कमी वाळवा तालुक्यामध्ये ९३७ आहे. जिल्हयाचे स्त्री पुरुष प्रमाण राज्याच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे.

*८.५ साक्षरता-* सांगली जिल्हयात २००१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण ७६.६९ टक्के इतके आहे.साक्षरतेचे प्रमाण पुरुषामध्ये ८६.२७ टक्के तर स्त्रीया मध्ये ६६.८८ टक्के इतके आहे.त्याचप्रमाणे ग्रामीण लोकसंख्येमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७४.२२ टक्के व नागरी लोकसंख्ये मध्ये हेच प्रमाण ८४.२१ टक्के इतके आहे. साक्षरतेचे प्रमाण मिरज तालुक्यात सर्वाधिक ८१.९३ टक्के तर जत मध्ये सर्वात कमी ६३.१५ टक्के आहे.

*८.६ अनु.जाती/जमातीचे प्रमाण-* १९९१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या १२.७९ टक्के अनु.जातीचे व ०.४९ टक्के अनु.जमातीचे लोक आहेत.अनु.जाती व जमातीच्या लोकसंख्येपैकी ७६ टक्के ग्रामीण भागात व उर्वरीत २४ टक्के शहरी भागात रहातात.

*८.७ काम करणारे-* १९९१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी ३७ टक्के काम करणारे ७ टक्के सिमांतीक काम करणारे व उर्वरीत ५६ टक्के काम न करणारे आहेत.एकूण काम करणा-यामध्ये ४३ टक्के शेतकरी २४ टक्के शेतमजूर, ९ टक्के उद्योग व सेवा मध्ये तर ७ टक्के व्यापार व अन्य व्यवसायात काम करणारे आहेत.

**९. जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न**

*९.१ चालू किंमतीनुसार जिल्हा उत्पन्न -* चालू किंमतीनुसार जिल्हयाचे २००१-२००२ चे स्थूल उत्पन्न ६४२१.८२ व निव्वळ उत्पन्न रु.५८२९.२५ कोटी असून गतवर्षीच्या तुलनेत सुमारे ६.९ टक्केनी अधिक आहे. चालू किंमती नुसार जिल्हयाचे स्थूल उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या २.३६ टक्के व निव्वळ उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या २.४१ टक्के आहे. चालू किंमतीनुसार जिल्हयाचे दरडोई स्थूल उत्पन्न रु. २४६८४ असून निव्वळ उत्पन्न रु. २२४०६ आहे. सदरचे दरडोई उत्पन्न राज्य दरडोई उत्पन्ना पेक्षा अनूक्रमे रु ३०७१ व रु.२३३० नी कमी आहे.

चालू किंमतीनूसार जिल्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २७ टक्के प्राथमिक क्षेत्रातून,
२० टक्के व्दितीय क्षेत्रातून व उर्वरीत ५७ टक्के तृतीय क्षेत्रातून प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे एकूण स्थूल जिल्हा उत्पन्नाच्या २३ टक्के व निव्वळ जिल्हा उत्पन्नाच्या २५ टक्के इतके उत्पन्न कृषि क्षेत्राखाली झाले आहे.

*९.२ स्थिर किंमतीनुसार जिल्हा उत्पन्न -* सन १९९३-९४ च्या किमतीनुसार सांगली जिल्हयाचे वर्ष २००१-२००२ चे एकूण स्थूल जिल्हा उत्पन्न ४१७५.०६ कोटी व निव्वळ उत्पन्न रु.३७८१.२६ कोटी अंदाजीत करण्यात आले आहे. गतवर्षीच्या तूलनेत चालू वर्षी स्थूल व निव्वळ उत्पन्नात अल्पशी वाढ झाली आहे.जिल्हयाचे स्थूल उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या २.७० टक्के असून जिल्हयाचे निव्वळ उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या २.७६टक्के आहे. जिल्हयाचे दरडोई स्थूल उत्पन्न १६०४८ रु. असून निव्वळ दरडोई उत्पन्न १४५३४ रु आहे. जिल्हयाचे स्थूल व निव्वळ दरडोई उत्पन्न राज्य दरडोई उत्पन्ना पेक्षा अनूक्रमे रु. ९८१ व रु ५३६ नी कमी आहे.

जिल्हयांच्या एकूण स्थूल उत्पन्नाच्या ३० टक्के उत्पन्न प्राथमिक क्षेत्रातून, २० टक्के व्दितीय क्षेत्रातून व ५० टक्के उत्पन्न तृतीय क्षेत्रातून प्राप्त झाले आहे. निव्वळ उत्पन्नाच्या बाबतीत हेच प्रमाण अनूक्रमे ३१ टक्के, १८ टक्के, व ५१ टक्के असे आहे. एकूण स्थूल जिल्हा उत्पन्ना पैकी २९ टक्के व निव्वळ जिल्हा उत्पन्नाच्या ३१ टक्के उत्पन्न प्राथमिक क्षेत्राअंतर्गत कृषि क्षेत्रातून प्राप्त झाले आहे.

जिल्हा स्तरावरील उत्पन्नाचे अचूक अंदाज करण्यासाठी 'प्रदेशाला संचयित होणारे उत्पन्न ' ही संकल्पना वापरणे योग्य असले तरी, जिल्हास्तरावरील आर्थिक उलाढालीचा परिणाम जिल्ह्यापुरताच मर्यादित राहत नसल्याने संबधित जिल्हयाला बाहेरुन प्राप्त होणारे व संबधित जिल्हयातून बाहेर जाणाऱ्या उत्पन्नाचे मोजमाप करणे शक्य नसल्याने, सदर पध्दतीचा वापर करता येत नाही. त्यामुळे 'उत्पन्न स्त्रोत पध्दती ' (Income originating approach) या संकल्पनेचा अवलंब करुन जिल्हा स्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यात आलेले आहेत.

जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याकरिता लागणारी मुलभूत माहिती अजुनही समाधानकारकरित्या उपलब्ध नाही. प्राथमिक क्षेत्राकरिता बहुतांश आकडेवारी उपलब्ध आहे. मात्र इतर क्षेत्राकरिता आकडेवारी अतिशय अल्पशा प्रमाणात उपलब्ध आहे. ज्या क्षेत्राकरिता आकडेवारी उपलब्ध नाही, त्या क्षेत्राकरिता जिल्हावार अनुरुप असे निर्देशांक वापरुन त्या आधारे राज्यस्तरावरील उत्पन्नाची जिल्हयामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.

आकडेवारीचा उपलब्धतेचा अभाव, अनुरुप निर्देशांकाचा वापर तसेच पध्दतीमधील अंगभूत उणीवा या सर्वामुळे जिल्हा उत्पन्नाचे अचुक अंदाज बांधण्यामध्ये मर्यादा येत असल्याने, हे अंदाज ढोबळ मानाने जिल्हयातील उत्पन्नाची पातळी आजमावण्याकरिता वापरावेत. या प्रकाशनात प्रकाशित केलेले जिल्हा उत्पन्नाचे अंदाज वापरतांना वरील मर्यादा लक्षात घ्याव्यात.

**१०. वहिती धारण-**

कृषी गणना १९९०-९१ नुसार जिल्हयातील एकूण ७.२१ लाख हेक्टर जमीन ४.०७ लाख वहिती खात्यात विभागली आहे.त्यापैकी ७.१४ लाख हेक्टर जमिन वैयक्तीक वहिती खात्यात व उर्वरीत संयुक्तीक व संस्था खात्यात विभागली आहे.एकूण खातेदारापैकी ४९ टक्के खातेदार अत्यल्पभूधारक असून त्यांचेकडे १ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन आहे. त्याखालोखाल २३ टक्के खातेदार अल्प भूधारक असून त्यांचेकडे एक ते दोन हेक्टर जमीन आहे. व १८ टक्के खातेदाराकडे २ ते ४ हेक्टर जमीन आहे.उर्वरीत १० टक्के खातेदारांच्याकडे ४ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आहे.

**११. जमिनीचा वापर -**

सन १९९८-९९ च्या अंतिम आकडेवारी नुसार जिल्हयाच्या एकूण ८.६१ लाख हेक्टर क्षेत्रा पैकी जवळजवळ २२ टक्के क्षेत्र हे जंगलव्याप्त ,ओसाड व नापीक,बिन शेती उपयोगाचे ,कायम पडक्षेत्र, तसेच कुरणे व चराऊ राने व झाडे झुडपा खालील म्हणजेच लागवडी योग्य नसलेले आहे.त्याशिवाय एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ९ टक्के क्षेत्र चालू व इतर पडीत आहे.उर्वरीत ६९ टक्के क्षेत्र हे लागवडी योग्य आहे.लागवडी योग्य क्षेत्रापैकी ८३ टक्के क्षेत्र संदर्भ वर्षामध्ये निव्वळ पेरलेले क्षेत्र होते.निव्वळ पेरलेल्या क्षेत्राची लागवडी लायक क्षेत्राशी टक्केवारी जत (९७) व वाळवा (९१) तालुक्यात सर्वाधिक होते व तासगाव तालुक्यात सर्वात कमी (७८ टक्के) दिसून येते.

जिल्हयामध्ये संदर्भ वर्षात पिकाखालील एकूण क्षेत्र सुमारे ७.७८ लाख हेक्टर असून त्यापैकी २१ टक्के क्षेत्र दुबार पिकाखालील आहे. दुबार पिकाखालील क्षेत्राची एकुण पिकाखालील क्षेत्राची टक्केवारी वाळवा तालुक्यामध्ये सर्वाधिक ३९ टक्के असून त्याखालोखाल शिराळा तालुक्यात ३६ टक्के आहे.तासगांव व जत या तालुक्यामध्ये दुबार पिकाखालील क्षेत्र एकूण पिकाखालील क्षेत्राच्या सर्वात कमी म्हणजे १३ टक्के आहे.

**१२. मुख्य पिके व त्याखालील क्षेत्र-**

जिल्हयात सन १९९८-९९ मध्ये एकुण पिकाखालील क्षेत्रापैकी ७० टक्के क्षेत्र अन्नधान्याखाली १७ टक्के क्षेत्र गळीताच्या पिकाखाली ८ टक्के क्षेत्र ऊसाखाली व ७ टक्के क्षेत्र चा-याच्या पिकाखाली होते उर्वरीत २ टक्के क्षेत्र हे प्रामुख्याने फळे भाजीपाला,कापूस व तंबाखू पिकाखाली होते.एकूण अन्नधान्य पिकाखालील क्षेत्रापैकी सुमारे ८१ टक्के क्षेत्र तृणधान्याखाली व उर्वरीत १९ टक्के कडधान्याखाली होते.एकूण तृणधान्याखालील पिकापैकी ६० टक्के क्षेत्र खरीप व रब्बी ज्वारी खाली व २३ टक्के बाजरी खाली होते.एकूण कडधान्य पिकाखालील क्षेत्रापैकी २३ टक्के क्षेत्र मठ, ३१ टक्के हरभरा,१२ टक्के कुळथी, १४ टक्के तूर व १७ टक्के मूग व उडीद या पिकाखाली आहे. उर्वरीत क्षेत्र मसूर,वाल,चवळी या पिकाखाली आहे. एकूण गळीताच्या पिका खालील क्षेत्रापैकी ४९ टक्के सोयाबीन पिकाखाली ,३३ टक्के भुईमूग पिकाखाली व उर्वरीत १८ टक्के क्षेत्र करडई,सुर्यफूल व कारळा पिकाखाली आहे.

जिल्हयामध्ये भात हें प्रामुख्याने शिराळा तालुक्यात, खरीप व रब्बी ज्वारी तसेच कडधान्ये जत तालुक्यात व ऊस हे पीक वाळवा तालुक्यामध्ये मोठया प्रमाणावर घेतले जाते.

**१३. अधिक उत्पन्न देणारी ; संकरीत व सुधारित पिके व त्याखालील क्षेत्र-**

सन २००२-०३ मध्ये जिल्हयामध्ये सुमारे २.१० लाख क्षेत्रामध्ये अधिक उत्पन्न देणारी पिके, १.३३ हजार हेक्टर मध्ये संकरीत पिके व ७७ हजार हेक्टर मध्ये सुधारित पिके घेण्यात आली आहेत. गतवर्षीच्या तुलनेत चालू वर्षी अधिक उत्पन्न देणा-या पिकाखालील क्षेत्र व संकरीत पिकाखालील क्षेत्र वाढलेले आहे.

**१४. मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन-**

सन २००२-०३ मध्ये उत्पादित झालेल्या मुख्य पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनाचा विचार केला असता गतवर्षीच्या तुलनेत ज्वारी, बाजरी, गहु,मका,नाचणी व तांदुळ या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात घट तसेच कापूस व तूर या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात वाढ दिसून येते. एकूण कडधान्याच्या सरासरी उत्पादनात गतवर्षीच्या तुलनेत घट असल्याची दिसून येते.

**१५. रासायनिक खताचे वाटप/वापर-**

जिल्हयामध्ये २००२-०३ या वर्षामध्ये सुमारे १.२१ लाख मे.टन रासायनिक खताचे वाटप झालेले आहे.हे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत कमी झालेले आहे.जिल्हयात वाटप झालेल्या एकूण रासायनिक खतापैकी जवळ जवळ ७१ टक्के मिरज,तासगांव,वाळवा,व खानापूर या चार तालुक्यात वाटप झालेले आहे.सर्वात कमी केवळ ९ टक्के रासायनिक खतांचा वाटप कवठे महांकाळ तालूक्यात झाले आहे.

**१६. कृषि उत्पादन व पणन-**

जिल्हयात सांगली,तासगांव,खानापूर,आटपाडी वाळवा व पलूस या सहा नियंत्रीत बाजारपेठा आहेत. या बाजारपेठा मध्ये प्रामुख्याने ज्वारी,मका,सोयाबीन,तांदुळ ,कांदे,गुळ व हळद यांची मोठया प्रमाणावर आवक होते. सांगली बाजारपेठ हळदीसाठी प्रसिध्द आहे.

**१७. सिंचन सुविधा-**

सांगली जिल्हयामध्ये वारणा पाटबंधारे प्रकल्प, आरफळ स्टोअरेज,कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प,टेंबू उपसा सिंचन योजना व कृष्णा कालवा हे पाच मोठे प्रकल्प असून या प्रकल्पा खाली सांगली जिल्हयातील एकूण ४.७२ लाख हेक्टर क्षेत्र या प्रकल्पाच्या लाभ क्षेत्राखाली येते.सद्या २००२-२००३ मध्ये वरील प्रकल्पापैकी सांगली जिल्हयातील वारणा व कृष्णा कालवा या दोन प्रकल्पाखाली बारमाही ८८९२ हेक्टर व हंगामी ४६८९ हेक्टर असे एकूण १३५८१ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे.उर्वरीत प्रकल्प अपूर्ण असल्याने ते पूर्ण झालेनंतर जिल्हयाचे उर्वरीत क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

जिल्हयामध्ये येरळवाडी,सिध्देवाडी,मोरणा,दोडडनाला,बसाप्पावाडी,संख,व म्हसवड तलाव कालवा हे सात मध्यम प्रकल्प कार्यान्वीत असून या प्रकल्पाचे सांगली जिल्हयातील लाभक्षेत्र सुमारे १४०२७ हेक्टर आहे.वरील प्रकल्पाखाली २००२-०३ मध्ये जिल्हयातील ४०० हेक्टर क्षेत्र बारमाही व ९२७ हेक्टर क्षेत्र हंगामी ओलिताखाली आलेले आहे.त्याशिवाय जिल्हयात संदर्भ वर्षात १०७२ लघु पाटबंधारे प्रकल्पाखालील सुमारे ७३३१४ हेक्टर लाभक्षेत्रापैकी ७२००२ हेक्टर ओलिताखाली आले आहे. कृष्णा व वारणा नद्यावरील खाजगी व सहकारी उपसा सिंचन योजनेद्वारे देखील बरेचसे क्षेत्र ओलिताखाली आले आहे.

**१८. ओलिताखालील क्षेत्राची वर्गवारी-**

१९९८-९९ च्या आकडेवारी नुसार जिल्हयामध्ये सुमारे १.७४ लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली असून त्यापैकी ७२ टक्के क्षेत्र विहिरीखाली व उर्वरीत २८ टक्के क्षेत्र पृष्ठभागीय ओलिताखाली आहे.जिल्हयाचे निव्वळ ओलिताखालील क्षेत्राचे लागवडीखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण सुमारे २० टक्के येते.ओलिताखालील एकूण क्षेत्राचे लागवडीखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण सर्वाधिक तासगाव व मिरज तालुक्यात ३७ टक्के तर सर्वात कमी

शिराळा ११ टक्के व जत तालुक्यात १२ टक्के आहे. एकूण ओलिताखालील क्षेत्रापैकी ४७ टक्के क्षेत्र अन्नधान्य पिकाखालील व ३७ टक्के क्षेत्र ऊस पिकाखालील आहे.उर्वरीत १८ टक्के ओलीताखालील क्षेत्र फळे,भाजीपाला,गळीताची पिके,व संकीर्ण अखाद्य इ. पिकाखालील आहेत. निव्वळ ओलिताखालील क्षेत्राचे ओलीता खालील एकूण क्षेत्राशी प्रमाण ९० टक्के आहे, व उर्वरीत १० टक्के क्षेत्र दुबार ओलिताच्या पिका खालील आहे.

**१९. दुष्काळ अवर्षण व पूर परिस्थिती -**

जिल्हयात २००२-०३ मध्ये आटपाडी तालुक्यामधील ३४ व जत तालुक्यातील ६७ गावांमध्ये दुष्काळ व तीव्र टंचाई निर्माण झाली होती. त्यामध्ये वरील संपूर्ण १०१ गांवामध्ये जमीन महसुलात पूर्ण सूट देण्यांत आली आहे.

**२०. पशुधन व पशुवैद्यकीय सोयीसुविधा-**

सन १९९७ च्या पशुगणनेप्रमाणे सांगली जिल्हयांत १४.३८ लाख इतके पशुधन आहे.त्यापैकी १९ टक्के गाई व बैल,३३ टक्के म्हैशी व रेडे , २६ टक्के शेळया, १७ टक्के मेंढया व ७

टक्के इतर पशुधन आहे. कुक्कुट आदि पक्षी सुमारे २४.३३ लाख आहेत गोजातीय पशुधनामध्ये सुमारे १९ टक्के संकरीत व विदेशी जातीचे पशुधन आहे .सांगली जिल्हयामध्ये दरचौरस कि.मी. मागे पशुधनाची घनता १६८ इतकी येते.

पशुवैद्यकिय सुविधांतर्गत जिल्हयात १ पशुवैद्यकिय सर्व चिकित्सालय मिरज येथे कार्यरत आहे.त्याशिवाय जिल्हयात ६९ पशुवैद्यकिय दवाखाने, २६ पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्रे,१ फिरता पशुवैद्यकीय दवाखाना ,एक जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र , ३ विभागीय कृत्रिम रेतन केंद्रे ,एक आधारभूत ग्राम केंद्र व १७० कृत्रिम रेतन केंद्रे कार्यरत आहेत. जिल्हयामध्ये जत येथे पशुपैदास केंद्र व रांजणी येथे शेळी पैदास केंद्र कार्यरत आहे.वरील सर्व संस्थामार्फत पशुधनाकरिता उपचाराचे कार्य केले जाते.सन २००२-०३ मध्ये ३.७९ लाख जनावरावर औषधोपचार केला असून २० हजार जनावरांचे खच्चीकरण केले आहे.१७० कृत्रिम रेतन केंद्रे, जिल्हा व विभागीय कृत्रिम रेतन केंद्रे व आधारभूत ग्रामकेंद्रामार्फत सुमारे १.६० लाख जनावरांना कृत्रिम रेतन करुन ७८०३९ वासरे जन्माला आली आहेत.तसेच सुमारे १२.४७ लाख जनावरांना लस टोचणी करण्यात आली आहे.

**२१.दुग्ध व्यवसाय विकास -**

जिल्हयात सन २००२-०३ मध्ये ७ दुध संघामार्फत व ६७३ दुग्ध सहकारी संस्थाच्या सहकार्याने प्रतिदिन २.०४ लाख लिटर याप्रमाणे सुमारे ७.७७ कोटी लिटर दूध संकलीत करण्यांत आले.जिल्हयामध्ये १० शीतगृहे असून .त्यांची क्षमता ४ लाख लिटर आहे.

**२२. मत्स्यव्यवसाय -**

सांगली जिल्हयातील नद्यांची लांबी ३९२ कि.मी.असून मत्स्यव्यवसायासाठी अनुकूल ६७६९ हेक्टर क्षेत्र तळी,सरोवरे,व जलाशय मार्फत उपलब्ध झालेले आहे.संदर्भ वर्षात भूजल मत्स्य उत्पादन २७१० मे.टन झाले असून त्याची उत्पादकास मिळालेली किंमत रु.२ कोटी इतकी आहे.संदर्भ वर्षात मत्स्यव्यवसाय क्षेत्रासाठी १७.८७ लाख मत्स्यबीज वापरण्यात आले आहे.

**२३. विद्युतीकरण व विजेचा वापर -**

सन २००३ अखेर जिल्हयातील सर्व शहरांचे व खेडयांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे.तसेच संदर्भ वर्षात २२३९ कृषि पंपाना विज पुरवठा केला आहे.

जिल्हयात २००२-०३ मध्ये ११९०००० हजार किलो वॅट इतका वीज वापर झाला असून त्यापैकी ४६ टक्के कृषि क्षेत्रासाठी ,२८ टक्के औद्योगीक क्षेत्रासाठी ,१७ टक्के घरगुती वापरासाठी,८ टक्के व्यापारी कामासाठी व उर्वरीत ३ टक्के सार्वजनिक दिवाबत्ती व इतर प्रयोजनासाठी वापरण्यांत आलेली आहे.संदर्भ वर्षात ४.९८ लाख विद्युत कनेक्शन देण्यांत आली आहेत.

**२४. उद्योग व रोजगार -**

जिल्हयामध्ये ९ औद्योगीक वसाहती / संस्था असून त्यामध्ये छोटे मोठे उद्योग कार्यरत आहेत.सन २००२ मध्ये जिल्हयात नोंदणी झालेले ६८१ कारखाने असून गतवर्षी

पेक्षा १ ने घट झालेली आहे.एकूण ६८१ कारखान्यापैकी ६१९ कारखाने चालू असून ६२ कारखाने बंद आहेत. ६१९ चालू कारखान्यापैकी ३९८ कारखाने शासनाकडे नियमीत माहिती सादर करतात.त्या कारखान्यामध्ये संदर्भ वर्षात १६५५० कामगार काम करीत असून ४७ लाख मनुष्य दिन रोजगार निर्माण झाला आहे. १९९६-९७ मध्ये वार्षिक उद्योग पाहणीच्या निष्कर्षानुसार एकूण उत्पादन २०१३ कोटी झाले असून ४३८ कोटी रुपयांची मूल्यवृध्दी झाली आहे.

*<u>२४.१ रोजगार विनीमय केंद्र</u>* - वर्ष २००२ अखेरीस रोजगार विनीमय केंद्रातील पटावरील उमेदवारांची संख्या ७९४९० इतकी असून संदर्भ वर्षात ९६० रिकाम्या जागा जाहीर करण्यांत आल्या आहेत.पटावरील उमेदवारापैकी २६१ उमेदवारांना संदर्भ वर्षात नोकरी मिळाली आहे.

**२५. आर्थिक गणना-**

आर्थिक गणना १९९८ मध्ये घेण्यांत आली. प्रस्तूत गणनेंअंतर्गत जिल्हयामध्ये एकूण ११२७७५ उद्योग असून ६८ टक्के उद्योग ग्रामीण भागात व उर्वरीत ३२ टक्के उद्योग नागरी भागात आहेत.त्याचप्रमाणे एकूण उद्योगापैकी ९७ टक्के खाजगी क्षेत्राखाली आहेत.वरील सर्व उद्योगामध्ये काम करणा-या कामगारांची संख्या २६५१७९ असून प्रति आस्थापना मध्ये सरासरी दोन कामगार असे प्रमाण दिसून येते.तसेच वेतनावर असलेल्या कामगारांची एकूण कामगारांशी टक्केवारी ४७ इतकी येते.

कृषि व बिगर कृषि आस्थापना मधील कामगारांचे प्रमुख उद्योग गटानुसार वर्गीकरण केले असता असे येते की २ टक्के कामगार शेती संबंधी सेवा, २६ टक्के कामगार वस्तुनिर्माण,१७ टक्के कामगार घाऊक किरकोळ व्यापार,७ टक्के कामगार बँका व विमा,७ टक्के कामगार वाहतूक सेवा,२ टक्के कामगार विषयक सेवा व ४१ टक्के कामगार सामाजिक व सामूहिक सेवात काम करत आहेत असे आढळले.

**२६. सहकार-**

सन २००२-०३ अखेर जिल्हयात एकूण ४८३४ सहकारी संस्था असून त्यापैकी ६८१ कृषि पतसंस्था, १४९१ बिगर कृषि पतसंस्था, ४७ पणन संस्था, १६९६ उत्पादक संस्था व ९१९ सामाजिक सेवा संस्था कार्यरत होत्या. या सर्व संस्थामधील सभासदांची संख्या १७.९७ लाख इतकी आहे. एकूण संस्थापैकी १९७२ संस्था नफा मिळालेल्या व १३१८ संस्था तोटयाखालील आहेत.जिल्हयामध्ये १२ साखर कारखाने असून त्यांच्याद्वारे संदर्भ वर्षात ४४.६६ लाख मे.टन ऊसाचे गाळप करुन ५.२२ लाख मे.टन साखरेचे उत्पादन झाले आहे.

**<u>२७.वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य-</u>**

जिल्हयामध्ये २००२-०३ मध्ये १७ रुग्णालये ,७० दवाखाने,४ प्रसूती गृहे,५९ प्राथमिक आरोग्य केंद्रे,२७० प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे कार्यरत आहेत.प्रस्तूत वैद्यकीय संस्थामध्ये २०४४ खाटांची सोय करण्यांत आली असून संदर्भ वर्षामध्ये २.३७ लाख आंतररुग्ण व १२.२३ लाख बाहय रुग्णांवर उपचार करण्यांत आले आहेत.जिल्हयात वरील संस्थामध्ये ३६५ डॉक्टर व १०३३ परिचारीका काम करीत आहेत.

सन २००२ मध्ये नोंदलेल्या जन्माची संख्या ५३३४९ इतकी असून नोंदलेले मत्यू १७६८४ इतके आहेत.जिल्हयामध्ये सन २००२ मध्ये ४८९ बालमत्यूची नोंद झालेली आहे.

**२८. कुटूंब कल्याण कार्यक्रम-**

जिल्हयामध्ये ६६ कुटूंब कल्याण केंद्रे कार्यरत असून त्यापैकी ५९ केंद्रे ग्रामीण भागामध्ये कार्यरत आहेत.उर्वरीत ७ केंद्रे नागरी भागात कार्यरत आहेत. सन २००२-०३ मध्ये जिल्हयात २५७०१ नसबंदीच्या शस्त्रक्रिया करण्यांत आल्या असून त्यापैकी ९८ पुरुष नसबंदीच्या शस्त्रक्रिया आहेत.जिल्हयात सुमारे ३.४७ लाख जननक्षम जोडपी असून त्यापैकी ३.१५ लाख ग्रामीण भागातील आहेत

माता व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत संदर्भ वर्षात त्रिगुणी लस,पोलिओ,बी.सी.जी. गोवर तसेच धनुर्वात इ.लसी टोचण्यांत आल्या आहेत.

**२९. शैक्षणिक संस्था व विद्यार्थी-**

जिल्हयात सन २००१-२००२ मध्ये १३६६ पूर्व प्राथमिक शाळा,११६० कनिष्ठ व ६८५ वरिष्ठ प्राथमिक शाळा,४२६ माध्यमिक,१०० उच्च माध्यमिक, २४ कनिष्ठ महाविद्यालये व ३२ सामान्य शिक्षणाची महाविद्यालये कार्यरत होती.

*२९.१ पूर्व प्राथमिक शाळा -* जिल्हयात १३६६ शाळांमध्ये ६०५१६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. .त्यासाठी १३६६ शिक्षक नियुक्त केले होते. पूर्व प्राथमिक शाळामध्ये प्रती शिक्षक विद्यार्थ्यांचे प्रमाण ४४ इतके होते.

*२९.२ कनिष्ठ प्राथमिक शाळा -* जिल्हयात ११६० कनिष्ठ प्राथमिक शाळामध्ये १०७२८५ इतके विद्यार्थी शिक्षण घेत होते. .त्यासाठी ३३४१ प्राथमिक शिक्षक नियूक्त केले होते. कनिष्ठ प्राथमिक शाळामध्ये प्रतिशिक्षक विद्यार्थी प्रमाण ३२ इतके येते.

*२९.३ वरीष्ठ प्राथमिक शाळा -* जिल्हयात ६८५ वरीष्ठ.प्राथमिक शाळामधून १९७४१९ इतके विद्यार्थी शिक्षण घेत होते. .त्यासाठी ५६४० शिक्षकांची नियुक्ती केली होती. वरीष्ठ प्राथमिक शाळातील प्रतीशिक्षक विद्यार्थी प्रमाण ३५ इतके येते.

*२९.४ माध्यमिक शाळा -* जिल्हयात ४२६ माध्यमिक शाळांमधून १४५२७५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ..त्यासाठी ४३९९ शिक्षकांची नियुक्ती केली होती. माध्यमिक शाळामध्ये प्रति शिक्षक विद्यार्थ्यांचे प्रमाण ३३ इतके येते.

*२९.५ उच्च माध्यमिक शाळा -* जिल्हयात १०० उच्च माध्यमिक शाळातून ११०११८ विद्यार्थी २९४४. शिक्षकामार्फत शिक्षण घेत होते. उच्चमाध्यमिक शाळामध्ये प्रति शिक्षक विद्यार्थी प्रमाण ३७ इतके येते.

२९.६ कनिष्ठ महाविद्यालये - जिल्हयात २४ कनिष्ठ महाविद्यालये कार्यरत असून ,त्यामध्ये १७१४९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यासाठी ४७४ प्राध्यापक नियुक्त केले होते. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रति प्राध्यापक विद्यार्थी प्रमाण ३६ इतके येते.

२९.७ वरीष्ठ महाविद्यालये - जिल्हयात सामान्य शिक्षणाची ३२ महाविद्यालये असून ,त्यामध्ये २३०१९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. .त्यासाठी ८८३ प्राध्यापक कार्यरत होते. महाविद्यालयामध्ये प्रति प्राध्यापक विद्यार्थी प्रमाण २६ इतके आहे.

वरील शैक्षणिक संस्थेव्यतिरीक्त जिल्हयात ,एक विधी महाविद्यालय ;एक वैद्यकीय महाविद्यालय व एक आयुर्वेदिक महाविद्यालय कार्यरत आहे. सदर संस्था मध्ये प्राध्यापक विद्यार्थी प्रमाण अनूक्रमे विधी महाविद्यालयात २७, वैद्यकीय महाविद्यालयात ४ व आयुर्वेदिक महाविद्यालयात १० इतके येते. त्याशिवाय १४ आय.टी.आय. व ११ डी.एड. महाविद्यालये जिल्हयात कार्यरत आहेत.

**३०.वाहतूक व दळणवळण-**

*३०.१ रस्ते -* सांगली जिल्हयामध्ये २००२-०३ अखेर नगरपालिका हद्दीतील रस्त्यासह एकूण ९७०३ कि.मी.लांबीचे रस्ते आहेत.त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिप.त्याखालील १०६९. कि.मी. जिल्हापरिषदेच्या अधिपत्याखाली ८१५९ कि.मी. व नगरपालिका व महानगरपालिका यांच्या अधिपत्याखाली ४७५ कि.मी.लांबीचे रस्ते आहेत एकूण रस्त्यापैकी ४३ टक्के डांबरी ,२४ टक्के खडीचे व उर्वरीत ३३ टक्के इतर माल वापरुन तयार केलेले आहेत.

*३०.२ रेल्वेमार्ग -* जिल्हयामधील रेल्वे मार्गाची लांबी १७३.९६ कि.मी.असूने .त्यापैकी ८६.३६ कि.मी. ब्रॉडगेज व ८७.६० कि.मी.नॅरोगेज आहे.

*३०.३ वापरात असलेली वाहने-* सन २००२-०३ मध्ये जिल्हयात एकूण २.३३ लाख वाहने वापरात होती.त्यामध्ये १.७६ लाख दुचाकी वाहने होती.त्याचप्रमाणे जिल्हयात १८७२४ जीप्स ;९६६८ ट्रॅक्टर्स व ९८२६ जोड वाहने, १०९८७ मालमोटारी व ५४७४ रिक्षा वापरात आहेत.

*३०.४ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ-* महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास संदर्भ वर्षात ८१२ बस गाडया मार्फत प्रतिदिन सरासरी ३.३५ लाख प्रवाशांची वाहतूक करुन रु. ११८.७५ कोटीचे उत्पन्न मिळाले आहे.दर प्रवाशा मागे सरासरी रु.९.६९ चे उत्पन्न परिवहन महामंडळास प्राप्त झाले आहे. महामंडळाच्या बसेस संदर्भ वर्षात एकूण ६२११० कि.मी. लांबीच्या १०४० मार्गावरुन धावत होत्या .

*३०.५ टपाल व दुरध्वनी सेवा-* जिल्हयात ४१६ पोष्ट कार्यालये असून पत्र पेठयांची संख्या १३०० इतकी आहे.जिल्हयात पोष्टांची सुविधा असलेल्या गावांची संख्या ३८८. इतकी असून जिल्हयात ९८ तारघरे कार्यरत आहेत.जिल्हयामध्ये १.६३ लाख दुरध्वनी कनेक्शन्स चालू करण्यात आली आहेत.

**३१. जिल्हा नियोजन -**

*<u>३१.१ वार्षिक योजना</u>* -सन २००२-०३ मध्ये जिल्हयात विविध विकास शिर्षाखाली एकूण जिल्हा वार्षिक (वि.घ.यो.सह) योजनेअंतर्गत रु. २९.४३ कोटी ,स्टेटपूल खाली रु. ६९.५५ कोटी ,अनुशेषाखाली रु. ६.२९ कोटी असा एकूण रु. १०१.२७ कोटी इतका खर्च झाला आहे.एकूण खर्चापैकी जवळ जवळ ५१ टक्के खर्च पाटबंधारे कामासाठी झाला असून ग्रामीण विकास कार्यक्रमासाठी २३ टक्के व सामाजिक व सामुहिक सेवासाठी १० टक्के इतका खर्च झाला आहे. उर्वरीत १६ टक्के खर्च इतर विकास कामावर झाला आहे.

*<u>३१.२ विशेष घटक योजना</u>*- सांगली जिल्हयासाठी सन २००२-०३ करिता विशेष घटक योजनेअंतर्गत ८.२९ कोटी तरतूद उपलब्ध करुन देण्यांत आली होती. सदरची तरतूद वर्षाअखेर पर्यंत १०० टक्के खर्च झाली आहे.त्यापैकी ५० टक्के सामाजिक व सामुहिक सेवा योजनावर, कृषि व संलग्न सेवा १६ टक्के, ग्रामीण विकास २१ व विद्युत विकास ११ टक्के या शिर्षातर्गत योजनावर व उर्वरीत २ टक्के खर्च वाहतूक व दळणवळण व इतर शिर्षाखालील योजनावर झाला आहे.

*<u>३१.३ आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम</u>*- सांगली जिल्हयासाठी २००२-०३ मध्ये विधानसभा सदस्यासाठी रु. ७२० लाख व विधानपरिषद सदस्यासाठी रु. १९७.५० लाख असा एकूण रु. ९१७.५० लाख निधी प्राप्त झाला होता.या निधीतून ८३१ जुन्या व नवीन कामावर रुपये ८६७.२७ लाख इतका खर्च झालेला आहे.म्हणजे प्राप्त निधीच्या ९५ टक्के इतका खर्च झाला आहे.

*<u>३१.४ खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम</u>*- खासदाराचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सांगली जिल्हयास १९९३-९४ पासून मार्च २००३ अखेर एकूण रु. २२.७५ कोटीचा निधी प्राप्त झाला असून त्यापैकी १८.५८ कोटी निधी १०८६ मंजूर कामासाठी वितरीत करण्यांत आला आहे.त्यापैकी मार्च २००३ अखेर रु.१७.७६ कोटी प्रत्यक्ष खर्च झाला असून .त्यातून आतापर्यंत ९९१ कामे पूर्ण झाली आहेत.

**३२. पोलीस दल-**

जिल्हयात २२ पोलीस ठाणी, २५ आऊट पोस्टस,१५ सबे पोस्टस,१८ लॉकप्स असून पोलीस ठाणे/ आऊट पोस्ट सोयी असलेली ६१ शहरे /गांवे आहेत.जिल्हयात १९३८ पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून पोलीस दलाचा २००२-०३ चा खर्च रु. १८४१ लाख इतका आहे.

**३३. बँका व विमा-**

<u>३३.१ बँका</u> - सांगली जिल्हयात एकूण १८३ गावांमध्ये बँकाची कार्यालये कार्यरत आहेत.जिल्हयामध्य २० दर्गीकृत बँकांच्या १७८ शाखा असून सुमारे रु. १९६२ कोटीच्या ठेवी गुंतविलेल्या, आहेत तसेच रु. १९४९ कोटीची कर्जे वितरीत केली आहेत.त्याशिवाय ४८१ सहकारी बँकांच्या शाखा कार्यरत आहेत.

*<u>३३.२ विमा</u>* - जिल्हयात आयुर्विमा महामंडळाच्या ७ शाखा असून एकूण १२९८२४ विमापत्रे उतरविण्यांत आली असून विम्याची एकूण रक्कम रु. ७३७.४८ कोटी आहे.

**३४ . सार्वजनिक वितरण व्यवस्था-**

जिल्हयामध्ये १३२७ नियमीत रास्त भावाची दुकाने असून सन २००२ मध्ये १३९०० मे.टन तांदूळ ,२७६०० मे.टन गहू व, ९१६०० मे.टन साखर शिधापत्रिकेवर उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.

***